# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शामराव सुदंरराव खरात, : अपीलकर्ता
मु. पो. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शामराव सुदंरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष अधीक्षक, कार्यालय मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद - श्री. गंगाधर ग्यानबाजी गादेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक मुख्य प्रशासक, कार्यालय मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद - श्री. अभय लक्ष्मणराव पाठक | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, कार्यालय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद<br>- श्री. मधुकर माधवराव बिनोरकर | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य अभियंता, कार्यालय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद<br>- प्रदीप विश्वंभरराव मान्नीकर | : | उपस्थित |
| ३.६ | जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, कार्यालय अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद | : | उपस्थित |

- श्री. ए. वाय. पाटील

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २५-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १५-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०-०२-२००८ फेरसादर दि. २५-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित जन माहिती अधिकारी व संबंधित जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विविध चार कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकत होती. त्यामुळे त्यांचा अर्ज त्या कार्यालयांकडे दिनांक १९-१२-२००७ रोजी वर्ग करण्यात आला. असा माहितीचा अर्ज दुस-या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) नुसार पाच दिवसाच्या आत वर्ग करणे आवश्यक असते याची दक्षता भविष्यात जन माहिती अधिकारी यांना घ्यावी लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे आयोगास सांगितले की, अपिलार्थीच्या या माहिती अर्जावर तीन कार्यालयातर्फे दिनांक ०३-०१-२००८, १५-०१-२००८ व ३०-०७-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, ही बाब त्यांना मान्य आहे तथापि मुद्दा क्रमांक १ ची माहिती मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांच्याकडून अप्राप्त आहे ही माहिती त्यांना द्यावी लागेल. तथापि अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झाला असला कारणाने या प्रकरणातील संबंधित चारही जन माहिती अधिकारी यांनी मुख्य अभियंता यांचे मार्फत त्यांना एकत्रित रुपये २५००० /- शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा / स्पष्टीकरण आयोगास तीस दिवसाच्या आत सादर करावा लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## **आदेश**

१. मुद्दा क्रमांक १ बाबतची माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झाला असला कारणाने या प्रकरणातील संबंधित चारही जन माहिती अधिकारी यांनी मुख्य अभियंता यांचे मार्फत त्यांना एकत्रित रुपये २५००० /- शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा / स्पष्टीकरण आयोगास तीस दिवसाच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुदंरराव खरात, मु. पो. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक, कार्यालय मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य प्रशासक, कार्यालय मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, कार्यालय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य अभियंता, कार्यालय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, कार्यालय अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. मुख्य अभियंता, कार्यालय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती नजमा बेगम मिर्झा महोमद बेग, : अपीलकर्ता
घर नं. ५-१७-३४, नूतन कॉलनी, बडा तकया, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, तलत शिक्षण सेवकाची सहकारी पत संस्था (म.), कबाडीपुरा, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप निबंधक, सहकारी संस्था तालुका औरंगाबाद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती नजमा बेगम मिर्झा महोमद बेग | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, तलत शिक्षण सेवकाची सहकारी पत संस्था (म.), कबाडीपुरा, औरंगाबाद - श्रीमती शकीला बानो | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप निबंधक, सहकारी संस्था तालुका औरंगाबाद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०३-२००८ फेरसादर दि. ३०-०१-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी सचिव, तलत शिक्षण सेवकाची सहकारी पत संस्था (म.), औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये तलत शिक्षण सेवकाची सहकारी पत संस्थेसंदर्भात काही माहिती एकूण सात मुद्दयांव्दारे मागितली होती. तथापि केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ हा पतसंस्थेस लागू होत नसल्याकारणाने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. तसेच त्यांनी याबाबत त्यांचे लेखी म्हणणे व त्यासोबत राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने याच संस्थेसंदर्भात दिनांक ०७-०९-२००९ रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रत सादर केली.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

याप्रकरणी या आयोगाकडे यापूर्वी याच पत संस्थेसंदर्भात श्रीमती फौजिया बेगम सय्यद बद्रोद्दिन व इतर पाच यांनी व्दितीय अपील दाखल केले होते. त्यावेळी आयोगाने सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५६६६/०७ डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर यांच्या निर्णयाचा संदर्भ देऊन खारीज केले होते. हेच विवेचन या प्रकरणात लागू होते.

या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती नजमा बेगम मिर्झा महोमद बेग, घर नं. ५-१७-३४, नूतन कॉलनी, बडा तकया, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, तलत शिक्षण सेवकाची सहकारी पत संस्था (म.), कबाडीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था तालुका औरंगाबाद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. इम्तियाज खान पि. अय्याज खान, : अपीलकर्ता
क्रांती चौक, जुनी जुम्मा मस्जीद, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. इम्तियाज खान पि. अय्याज खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी<br>- श्री. र. वि. जुकटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रभारी कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी<br>- श्री. बा. भ. भोसले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-१२-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०३-२००८<br>फेरसादर दि. १७-१२-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रथम त्यांना पोस्टाने दिनांक १७-१२-२००७ रोजी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे व्यक्तिशः ती माहिती दिनांक २६-१२-२००७ रोजी देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना या सर्व बाबी विचारात घेऊन दिनांक ०५-०२-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती मिळाली असून त्याबाबत त्यांचा काहीही आक्षेप राहीला नाही व अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले असे नमूद केले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इम्तियाज खान पि. अय्याज खान, क्रांती चौक, जुनी जुम्मा मस्जीद, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर,<br>जिल्हा परभणी - श्री. बी. आर. वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि कार्यालय, परभणी - श्री. आर. एस. पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-१०-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-१२-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०४-२००८<br>फेरसादर दि. ०२- |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली काही माहिती प्रथमतः दिनांक ०५-११-२००७ रोजी पुरविण्यात आलेली आहे व उवरीत माहितीकरिता रुपये दोन प्रतिपृष्ठ याप्रमाणे आपणास आवश्यक असलेल्या पृष्ठांच्या संख्येच्या शुल्काचा भरणा करुन आपण प्रत्यक्ष या कार्यालयात येऊन घेऊन जाण्याबाबत कळविले आहे कारण अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर होती. यानंतर माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस दिनांक ०१-१२-२००८ रोजी जन माहिती अधिका-याने विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, मुद्दा क्रमांक ३ रोजगार हमी योजना कामाबाबतच्या सत्यप्रती अपिलार्थीस देय होत आहेत त्या द्याव्या लागतील. जन माहिती अधिकारी यांनी त्या विनामूल्य पंधरा दिवसाच्या आत देण्याचे आयोगास आश्वासीत केले.

या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत,<br>माहिती अधिकार मंच, जेल कॉर्नर, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड<br>- प्रतिनिधी - श्री. बी. एन. वांजरखेडकर, अ. का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड<br>- श्री. डी. एन. वानोळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-१२-२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०३-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००८<br>फेरसादर दि. ०४- |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या सहा मुद्दयांपैकी पाच मुद्दयांबाबत माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना काहीही माहिती मिळाली नाही असे आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना दिनांक १३-०३-२००८ खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

| | | |
|---|---|---|
| अ | शासकीय माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांनी मागणी केलेली माहिती विहीत मुदतीत पुरविली आहे काय. | होय |
| ब | शासकीय माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे काय. | होय |
| क | अपिलकाराने पहाणीसाठी मागणी केलेले अभिलेख दर्शविले आहेत काय. | नाही |

तसेच जन माहिती अधिका-याने मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात अपिलार्थीस अपेक्षित असलेले अभिलेखे सात दिवसाचे आत पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत असा निर्णय देऊन प्रकरण बंद केले आहे. प्रथम अपिलावरील सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते असे कागदपत्रावरुन दिसते व अपिलार्थीने ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात एक दिवस सुनिश्चित करुन त्यांच्या निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलकारास अपेक्षित असलेले अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी आयोगास आश्वासीत केले आहे की, दिनांक २० व २१-०१-२०११ रोजी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात ते माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देतील. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने ही बाब मान्य केली.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी त्यांच्या कार्यालयात दिनाक २० व २१ जानेवारी २०११ रोजी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यांना काही कागदपत्रांची आवश्यकता असल्यास त्याच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती विनामूल्य पुरविण्यात याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, माहिती अधिकार मंच, जेल कॉर्नर, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रभुदास एस.भालेराव, : अपीलकर्ता
रा. जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर)
उपविभाग, परतूर, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था. स्तर) विभाग, जालना.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर), उपविभाग, परतूर - श्री. अब्दुल खुद्युस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी श्री. एस.इथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. प्रत जोडलेली नाही. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०५.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०६.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी यांना उद्देशून दि. १०.०१.२०११ रोजी लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ दि. २९.०५.२००८ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे. करिता माझा अपील अर्ज निकाली काढण्यात यावा."

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभुदास एस.भालेराव, कमलारतन प्लाझा, जे.ई.एस.कॉलेज रोड, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर), उपविभाग, परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोविंद श्रीपतराव हिवाळे, : अपीलकर्ता
रा.परतुर, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता,
ल.पा.(स्था.स्तर),उपविभाग, परतुर, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. गोविंद श्रीपतराव हिवाळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर), उपविभाग, परतुर- श्री. अब्दुल खुद्युस | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्तर) विभाग, जालना -प्रतिनिधी- श्री. एस.ईथिराज, शाखा अभियंता | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०६.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने एप्रिल,२००५ ते दि. १५.०३.२००८ या कालावधीमध्ये प्रगतीपथावर असलेल्या पाझरतलावाच्या संदर्भात विस्तृत अशी माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रतींचा समावेशही आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ७(९)च्या तरतुदीन्वये त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीकरिता उपलब्ध करुन द्यावे लागतील. अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन संदर्भिय मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाण्यास व त्यातून आवश्यक तेवढी कागदपत्रे हस्तगत करण्यास अनुमती दर्शविली. त्याप्रमाणे अपिलार्थीस कागदपत्रांची पहाणी द्यावी.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणी करुन त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती अपिलार्थीस हस्तगत करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करावी. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोविंद श्रीपतराव हिवाळे, मु.पो.साठेनगर, ता.परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर), उपविभाग, परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नंदकुमार भागुराव जाधव,<br>रा.मेव्हणा, ता.बदनापूर, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>शिवाजी हायस्कुल, दाभाडी, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, शिवाजी शिक्षण संस्था, दाभाडी,<br>ता.बदनापूर, जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, दाभाडी, ता.बदनापूर, जि.जालना - श्री. एस.एल.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०६.२००८<br>(फेरसादर,दि.२१.०८.२००८) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कुल, दाभाडी, ता.बदनापूर, जि.जालना यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्रथमतः त्यांनी दि. ११.०४.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे अपिलार्थीस सशुल्क पाठविली आहे. यावर माहिती अपूरी आहे, असे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केल्यामुळे त्यांनी उर्वरित माहिती दि. १८.०३.२००९ रोजी अपिलार्थीस पुन्हा अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगासमोरील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे आढळून आले आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकुमार भागुराव जाधव, रा.मेव्हणा,पो.दाभाडी, ता.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, दाभाडी,ता.बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सचिव, शिवाजी शिक्षण संस्था, दाभाडी, ता.बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, : अपीलकर्ता
रा. आळेश्वर, ता.परंडा, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग,भूम,
जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, जि.प. (बांधकाम)उपविभाग,भूम, जि.उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,बांधकाम, विभाग, जि.प उस्मानाबाद - प्रतिनिधी श्री. एम.जी.खादर, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रत जोडलेली नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग,भूम,जि.उस्मानाबाद यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्रथमतः त्यांना त्यांच्याकडील दि. २१.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आलेली आहे. सदर माहिती अपिलार्थीने यांनी स्वीकारली आहे. याबाबत अपिलार्थी यांनी पोच दिलेली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दि.२१.०४.२००८ रोजी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व अपिलार्थीस पुन्हा त्यांना अपेक्षित असलेली पूर्वी दिलेल्या माहितीची एक प्रत समक्ष दिली, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. उपलब्ध कागदपत्रांवरुन यास पुष्टी मिळत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, मु. आळेश्वर, पो. डोंजा व्हाया सोनारी, ता.परंडा, जि.उस्मानाबाद - ४१३ ५०५

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जि.प. (बांधकाम)उपविभाग,भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,बांधकाम, विभाग, जि.प उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजाराम तुकाराम पवार, : अपीलकर्ता
रा.परतूर, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर),
परतुर उपविभाग,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
ल.पा. (स्थानिक स्तर),
विभाग, जि. जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. राजाराम तुकाराम पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, ल.पा. (स्था.स्तर), उपविभाग परतुर, जि.जालना - श्री. अब्दुल खुद्युस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) विभाग, जालना -प्रतिनिधी - श्री.एस.ईथिराज शा,अ. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०६.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०७.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर) परतुर उपविभाग, जि.जालना यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. ती व्यापक स्वरुपाची असल्यामुळे पहाण्यास उपलब्ध करुन देऊ शकतात. अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. या माहितीकरिता शुल्क `.११,०००/- भरलेले आहेत. सदर शुल्क या माहितीकरिता दिलेले आहेत याची खात्री करण्यात यावी व या माहितीसंदर्भातच हे शुल्क भरलेले असल्याची खात्री झाल्यास या संपूर्ण शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परत करावी लागेल. तसेच जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ७(९)च्या तरतुदीन्वये अपिलार्थीस माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीकरिता उपलब्ध करुन द्यावे लागतील. अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन संदर्भिय मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाण्यास व त्यातून आवश्यक तेवढी कागदपत्रे हस्तगत करण्यास अनुमती दर्शविली. त्याप्रमाणे अपिलार्थीस कागदपत्रांची पहाणी द्यावी.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस पहाणी करुन त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती विनामूल्य हस्तगत करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस सुनिश्चित करावा. तसेच अपिलार्थीने संदर्भित अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क `.११,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरल्याची खात्री झाल्यास, सदर शुल्काची संपूर्ण रक्कम अपिलार्थीस परत करावी. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम तुकाराम पवार, रा.स्वामी समर्थ कॉलनी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मोंढा यांच्या पाठीमागे, परतुर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ल.पा. (स्था.स्तर), उपविभाग परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहा.निबंधक सहकारी संस्था,<br>अंबड, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,<br>जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक निबंधक सहकारी संस्था, अंबड - श्री. एन.ए. परजणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जालना - श्री. राजेश सुरवसे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०४.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०६.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०८.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था,अंबड, जि.जालना यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्याचे प्रथमतः त्यांनी दि. ११.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित मजूर सहकारी संस्थेस सूचित केले होते. तथापि तसे घडले नाही. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जालना यांनी अपिलार्थीच्या दि.१४.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर दि. १७.०६.२००८ रोजी, 'अर्जदारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी', असा निर्णय दिलेला आहे.आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांना दि. १२.०१.२०११ रोजीच्या निवेदनाद्वारे अपिलार्थीने असे कळविले आहे की, त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती पूर्णपणे मिळाली आहे. या निवेदनाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगास सादर केली.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे,कांवदी गल्ली, अंबड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शंकरराव नरहरी देशमुख,<br>रा.वरवंटी, ता.जि.उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. शंकरराव नरहरी देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,<br>उस्मानाबाद - प्रतिनिधी श्री. आर.बी.भांडे, लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.१०.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२००८<br>(फेरसादर,दि.२३.०६.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मौ.वरवंटी,गावसुंद,सुर्डी,वडगाव(सि.),उपळा(मा.),शिंगोली,अंबहोळ ता.उस्मानाबाद या सात गावांच्या स्वस्त धान्य दुकानांची सविस्तर माहिती मागितली आहे. ती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही, या बाबीची आयोग गंभीर दखल घेत आहे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना तात्काळ द्यावी लागेल. त्याचप्रमाणे आजपर्यंत अपिलार्थीस ही माहिती देण्यात आली नाही व त्यामुळे अधिनियमाचे पालन करण्यात कसूर झालेला आहे. याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांना शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासाही सादर करावा लागेल.

वरील सर्व बाबीवरुन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

२) तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविलेली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन करण्यात कसूर झाला आहे. याकरिता त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून, जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांचेमार्फत हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशमुख शंकरराव नरहरी, मु.वरवंटी, पो.पोहनेर, ता.जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. तावरे हरीभाऊ माधवराव,<br>रा.चिकनगाव,ता.अंबड, जि. जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर),<br>उपविभाग परतुर,जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>ल.पा. (स्थानिक स्तर),<br>विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर), परतुर उपविभाग,जि.जालना- श्री. अब्दुल खुद्युस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर),विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस.ईथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | प्रत जोडलेली नाही. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९.०७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०८.०८.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.११.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर), परतुर उपविभाग,जि.जालना यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून दि. ०१.०१.२००७ ते ३१.०३.२००७ या कालावधीची असून यामध्ये ३५६ हजेरीपत्रकांचा समावेश होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पहाणीसाठी उपलब्ध करुन देऊ शकतील, असे आयोगासमोर प्रस्तावित केले. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करुन अपिलार्थीस माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीकरिता उपलब्ध करुन त्यातून आवश्यक तेवढी कागदपत्रे अपिलार्थीस द्यावी लागतील.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस पहाणी करुन त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती विनामूल्य हस्तगत करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करावी. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तावरे हरीभाऊ माधवराव,मु.पो.चिकनगाव,ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर), परतुर उपविभाग, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर),विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, : अपीलकर्ता
रा.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

नायब तहसीलदार (म.),

तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर जिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई,जि. बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री.रमेशचंद्र श्रीरामजी रामावत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड - श्री. टी.एस.चौधरी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अंबाजोगाई,जि.बीड- श्री. बी.एम.देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०६.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.११.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,अंबाजोगाई,जि.बीड यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे तहसील कार्यालय,पुरवठा विभाग,अंबाजोगाईमार्फत सन २००७-०८ या कालावधीमध्ये एकूण १२ किरकोळ केरोसिन विक्रेत्यांच्या केरोसिन परवान्याच्या नुतनीकरणासंदर्भात एकूण दोन मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस त्यांनी दि. २८.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. सदर पत्रावर अपिलार्थीने पोचसही दिलेली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्यावेळी मान्य केली तसेच मुद्दा क्र. २ च्या संदर्भात अभिलेखांचे निरीक्षण करण्याची मागणी केली होती. अपिलार्थी यांनी सदर अभिलेखांचे दि. ३१.०५.२००८ रोजी एक तास निरीक्षण केले आहे, त्यासंबंधीची पोचही अपिलार्थी यांनी दिलेली आहे. अपिलार्थीस ही बाबही मान्य आहे. त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज खारीज करण्यात यावा, अशी जन माहिती अधिकारी यांनी विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांनी युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी त्यांचे प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे दि. ०६.०६.२००८ रोजी केले होते. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी तहसीलदार, अंबाजोगाई हे असल्यामुळे त्यांच्याकडे हा प्रथम अपील अर्ज दि. १३.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रत्यक्षात दि. १८.०६.२००८ रोजी प्राप्त झाला. त्यांनी पुढे आयोगास असे अवगत केले की, दि. २६.०६.२००८ रोजी प्रथम अपिलावरील सुनावणी नोटीस काढण्यात आली व दि. ३०.०६.२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. या सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. या दोघांचेही लेखी जबाब नोंदविण्यात आले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे असे सांगितले की, अपिलार्थीस संपूर्ण उपलब्ध माहिती पुरविली आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मागणीप्रमाणे निरीक्षणासाठी अभिलेखही उपलब्ध करुन दिलेली आहेत व संपूर्ण माहिती दिलेली आहे. या सर्व कृतीमध्ये माहिती लपविण्याचा प्रयत्न कधीही केलेला नाही तर माहिती देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न होता. त्याचप्रमाणे बॉम्बे फायनान्स रुलनुसार चलनाच्या प्रतींचे जतन केले जाते. सदर अभिलेखांची वेळोवेळी निंदणी करण्यात आली आहे.त्यामुळे या चलनाच्या प्रती आता त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत, असेही आयोगास अवगत केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती मिळालेली आहे. तथापि मुद्दा क्र. १ मधील चलनाच्या प्रती मिळालेल्या नाहीत. त्याचप्रमाणे नवीन नुतनीकरण केलेल्या केरोसिन परवान्याच्या प्रती व नुतनीकरणासाठी दाखल केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती मिळाव्यात व आतापर्यंत त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची कागदपत्रे त्यांना प्रमाणित करुन द्यावीत.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस नवीन नुतनीकरण केलेल्या केरोसिन परवान्याच्या प्रती व नुतनीकरणासाठी दाखल केलेल्या दस्तावेजाच्या प्रती द्याव्यात व आतापर्यंत दिलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्रमाणित करुन देण्यात याव्यात. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत,जेलकॉर्नर पहिला माळा, अंबाजोगाई,जि.बीड

| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री.राजाराम भोंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद- श्री. हफिज अहमद रझवी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०९.२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८.१०.२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना दि. ०१.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या तीन मुद्यांवरील सामाईक चौकशी प्रगतीपथावर आहे व ती उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद यांचेकडे अंतिम टप्प्यामध्ये आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना अद्याप माहिती मिळालेली नाही.परंतु प्रथम पत्र त्यांना मिळाले आहे. संदर्भिय चौकशीची कार्यवाही अद्यापि झालेली नसल्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या प्रती त्यांना देता आल्या नाहीत.आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीबाबत सद्यस्थिती अपिलार्थीस लेखी स्वरुपात कळवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीबाबतची सद्यस्थिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कळवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे,बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी,पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शरद कुलकर्णी, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. शरद कुलकर्णी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना- श्री. ए.जी.कौरवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.१२.२००७ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०४.०४.२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि. १०.०१.२००८ रोजी पुरविण्यात आलेली आहे.अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली. त्यांनी आयोगास हे ही अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती पहाणी करण्यास उपलब्ध करुन दिली होती. त्यातून निवडक प्रती त्यांना प्राप्त झाल्या आहेत. परंतु त्या अस्पष्ट आहेत,असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीचे अभिलेख कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांच्या कार्यालयामध्ये पुन्हा पहाणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावे लागतील व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या साक्षांकित छायांकित प्रती विनामूल्य द्याव्या लागतील.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांना पहाणीसाठी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शरद कुलकर्णी,४,आर्या टावर्स, एडीसीसी स्टेडियम जवळ,एन-२,सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाष मारुतीराव तपके, : अपीलकर्ता
रा.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल (परिचर्या विभाग) संचालनालय,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

जन अपिलीय अधिकारी, :
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल (परिचर्या विभाग) संचालनालय,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.१२.२००८ (फेरसादर दि.१३.०७.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे २१ मुद्यांची सन २००५ ते २००८ या कालावधीची व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितलेली आहे. या माहितीमध्ये बरीच माहिती प्रश्नार्थक, खुलासे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी आहे. अशी माहिती वगळून उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस पहाण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी लागेल. यासाठी त्यांनी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करुन पुढील कार्यवाही करावी.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष मारुतीराव तपके,रा.मंगळवार पेठ,जिनकर गल्ली, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल (परिचर्या विभाग) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल (परिचर्या विभाग) संचालनालय,

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद खाजा सय्यद मिरा, : अपीलकर्ता
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड - श्री. विजयसिंह बंडूसिंह गहेरवार | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांच्यातर्फे श्री.बी.एन.तोटेवाड,प्रथम लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.१०.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.११.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.१२.२००८ |

(फेरसादर दि.१६.११.२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण पाच मुद्यांवर दि. ०१.०१.२००७ ते ३१.०८.२००८ या कालावधीची माहिती मागितली होती. त्यातील चार मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी सदरची माहिती व्यक्तिशः स्वीकारताना अपूर्ण माहितीबाबत त्यांचा शेरा नोंदविला आहे. उर्वरित मुद्दा क्र. २ ची माहिती अपिलार्थीस दि. २४.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे.अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मिरा, रहेमान मंजील,घर क्र.९-६-२२०,उमर कॉलनी, मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव,<br>रा. होंडाळा, ता.मुखेड, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>भूमि अभिलेख कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>भूमि अभिलेख कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा - उप अधीक्षक,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, मुखेड, जि.नांदेड- श्री. तुळशीराम सायन्ना कोरले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा - जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,नांदेड - श्री.राघो गणपतराव लाखाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०१.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०२.२००८ |

(फेरसादर दि.३०.११.२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमी अभिलेख, मुखेड, जि.नांदेड यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना प्रस्तुत सुनावणीचे सूचनापत्र (नोटीस) प्राप्त झाले नाही. तथापि आज उपसंचालक कार्यालयात बैठकीसाठी उपस्थित झाल्यानंतर त्यांना सदर प्रकरण आज रोजी सुनावणीस असल्याचे ज्ञात झाले. त्यामुळे सदर प्रकरणात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्यात यावी, अशी विनंती त्यांनी आयोगास केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु.होंडाळा पो.दापका (राजा),ता.मुखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमी अभिलेख, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तात्रय केशवराव मस्के, : अपीलकर्ता
रा. औंढा (नागनाथ),जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी श्रेणी-१,
पंचायत समिती,औंढा नागनाथ,जि.हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी श्रेणी-१,
पंचायत समिती,औंढा नागनाथ,जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०६.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०८.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०९.२००८ |

(फेरसादर दि.१९.११.२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही.त्यामुळे आयोगास प्रकरणातील सद्यस्थिती कळू शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ ते ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस प्रथमत: दि. १६.०६.२००८ रोजी देण्यात आलेली आहे व त्यानंतर उर्वरित माहिती लेखी स्वरुपात दि. ०३.०७.२००८ रोजी देण्यात आली आहे.अपिलार्थीस सदरची माहिती चुकीची,दिशाभूल करणारी वाटत असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील केले होते. प्रथम अपिलावर सुनावणी घेताना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०८.२००८ रोजी नमूद केले आहे की, लेखा विभाग,पंचायत समिती, औंढा नागनाथ (मुद्दा क्र. ४,५,६,७ व ८) यांनी दिलेली माहिती बरोबर आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. यावरुन आयोगाचे निष्कर्ष असे आहेत की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय केशवराव मस्के, पंचायत समिती औंढा (नागनाथ),जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्रेणी-१,पंचायत समिती, औंढा नागनाथ,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्रेणी-१,पंचायत समिती,औंढा

नागनाथ,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष यल्लाजी बांगर, : अपीलकर्ता
रा.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग,हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
सा.बां.मंडळ,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,हिंगोली -प्रतिनिधी- श्री. नाईकवाडे प्रकाश गोविंदराव,उपविभागीय अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,हिंगोली - श्री. एस.आर.बल्लारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०६.२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०९.२००८

(फेरसादर दि.१८.११.२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या एकूण ५ मुद्यांबाबतची माहिती (५३ पृष्ठे) दि. ०६.०५.२००८ रोजी अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांना दि. ०७.०५.२००८ रोजी प्राप्त झाली आहे. परंतु यामध्ये कार्यारंभ आदेशाच्या प्रती नाहीत,असे अपिलार्थी यांचे म्हणणे असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०६.२००८ रोजी घेतलेल्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णयामध्ये नमूद केले असल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, कार्यारंभ आदेशाच्या प्रती त्यांनी यापूर्वी दिलेल्या ५३ पृष्ठांच्या माहितीमध्ये अंतर्भूत आहेत व ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे.अपिलार्थी आज सुनावणीच्यावेळी अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर,रा.मंगळवारा बाजार,हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष यल्लाजी बांगर, : अपीलकर्ता
रा.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग,हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
सा.बां.मंडळ,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,हिंगोली - प्रतिनिधी - श्री. नाईकवाडे प्रकाश गोविंदराव,उपविभागीय अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,हिंगोली - श्री. एस.आर.बल्लारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०२.२००८ (प्रत जोडलेली नाही.) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.०५.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०९.२००८ (फेरसादर दि.०२.१२.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली एकूण ४ मुद्यांपैकी ३ मुद्यांबाबतची माहिती दि. ०७.०४.२००८ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे व उर्वरित एका मुद्याशी संबंधित माहिती दि.३१.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली आहे. याबाबतची पोच कार्यालयीन दप्तरी आहे. अपिलार्थी आज सुनावणीच्यावेळी अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर,रा.मंगळवारा बाजार,हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल मरीबा कांबळे, : अपीलकर्ता
रा.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी (ग्रा.),हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक,हिंगोली- श्री. जाधव रमेश उत्तम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०९.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१२.२००८ (फेरसादर दि.२०.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीबाबत चौकशी अहवाल प्राप्त झालेला नव्हता तसे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत प्रथमतः दि. १६.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. त्यानंतर दि.१३.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे चौकशी अहवालाची प्रत पाठविण्यात आलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर सुनावणीच्या वेळी सादर केलेली माहिती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे, असे आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल मरिबा कांबळे,रा. इंगोले यांचा वाडा, विकासनगर,कळमनुरी, ता. कळमनुरी, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी (ग्रा.),हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अजित एम.देशमुख, : अपीलकर्ता
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (म.),
तहसील कार्यालय,बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,बीड- श्री. प्रभोदय गोविंद मुळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०९.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.१०.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१२.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याकडील दि.२२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे खुलासेवजा माहिती पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याची पोच तहसील कार्यालयाच्या दस्तावेजामध्ये दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर सुनावणीच्या वेळी सादर केलेली माहिती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे, असे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजित एम.देशमुख,द्वारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड,बीड, ता.जि.बीड - ४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजयकुमार गुरुनाथ पवार,<br>रा. सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. राठोड एस. एच. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्रीमती यु. पी. बिरादार | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सोमनाथपूर - श्री. अंगद किशनराव केंद्रे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०७-२००८ |

फेरसादर दि. ३०-
१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी सध्याचे व तत्कालीन आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक २८-०५-२००८ रोजी पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थीने विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. माहिती एकत्र करण्यास विलंब झाला आहे. अपिलार्थीस माहिती पोस्टाने पाठविण्यात आली आहे. त्याचा पुरावा त्यांच्या नस्तीवर उपलब्ध आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊन दिनांक २२-०५-२००८ रोजी अपिलार्थीस एक महिन्याच्या आत माहिती द्यावी. असा निर्णय घेतला होता. त्याबरहुकूम जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविल्याचे आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार गुरुनाथ पवार, रा. सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमण गोविंदराव निडवदे, : अपीलकर्ता

तुलसी निवास, शाहुपुरी कॉलनी, चौंडा कॉम्प्लेक्सच्या मागे, राजीव गांधी चौक, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जायकवाडी वसाहत, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जायकवाडी वसाहत, परभणी<br>- श्री. आर. एफ. शेख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना<br>- प्रतिनिधी - श्री. डी. एन. गलबे, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०५-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये दिनांक ०१-०१-२००५ ते ०१-१२-२००७ या कालावधीची विस्तृत अशी माहिती तयार करुन मागितली आहे. यातील माहिती अपिलार्थीने तक्त्यामध्ये मागितली आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांच्या कार्यालयात अशा प्रकारची माहिती ठेवण्यात येत नाही व ती तयार करण्यास वेळ लागेल. आयोगाने सूचित केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती तक्त्यामध्ये ठेवण्यात येत नाही त्यामुळे ती तयार करुन देण्याची आवश्यकता नाही. तथापि उर्वरित मुद्दा क्रमांक १, २ व ३ वरील माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देय आहेत. त्या अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात. अपिलार्थीस आवश्यकता भासल्यास या कागदपत्रांची पाहणी देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी व तक्त्यामध्ये मागितलेल्या माहितीबाबत या कागदपत्राची पाहणी करण्यासाठी अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन देण्यात यावा. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमण गोविंदराव निडवदे, तुलसी निवास, शाहुपुरी कॉलनी, चौंडा कॉम्प्लेक्सच्या मागे, राजीव गांधी चौक, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जायकवाडी वसाहत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

ॲड अजित एम. देशमुख, : अपीलकर्ता
व्दारा - गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
साखर आयुक्त यांचे कार्यालय, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५

जन अपिलीय अधिकारी तथा :
साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा साखर सह संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५ - श्री. बी. जे. देशमुख | : उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा साखर सह संचालक (विकास), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५ - श्री. ए. यु. बनसोडे | : उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा साखर संचालक, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५ - प्रतिनिधी - श्री. बी. जे. देशमुख | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-१०-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-१२-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (१) व (२) व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण ९ मुद्दयांवर माहिती मागितलेली आहे. याबाबत अर्जदारास मुद्दा क्रमांक १ व ८ बाबतची वस्तुस्थिती दिनांक २२-०९-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सह संचालक विकास यांच्याकडून कळविण्यात आली असून मुद्दा क्रमांक २ ते ७ व ९ बाबत ही माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने त्यासाठी सह संचालक, अर्थ यांच्याकडे प्रकरण वर्ग केले आहे. जन माहिती अधिकारी तथा सह संचालक अर्थ यांनी त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस मुद्दा क्रमाकं २, ३, ४, ५, ६, ७ व ८ बाबत वस्तुस्थिती कळविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १०-११-२००८ रोजी निर्णय घेताना असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाप्रमाणे सर्व मुद्दयांवरील माहिती अद्यापही अपिलार्थीस देण्यात आलेली नाही ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी द्यावी. यानुसार जन माहिती अधिकारी तथा सह संचालक (अर्थ) यांनी अपिलार्थीस दिनांक १०-११-२००८ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक २, ३, ४, ५, ७, ८ व ९ ची माहिती पोस्टाने विनामूल्य पाठविली. प्रथम अपिलीय अधिकारी तथा साखर संचालक यांनी त्यांच्या प्रथम अपिलाच्या निर्णयात नमूद केले आहे की, प्रादेशिक सह संचालक (साखर) अहमदनगर, कोल्हापूर, नांदेड, पुणे, औरंगाबाद यांच्याकडे असलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन घेऊन ती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. ही माहिती अर्जदारास प्राप्त झाली आहे किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्राअभावी आयोगाच्या निदर्शनास येत नाही. तरी जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांचे आदेशात आदेशित केल्याप्रमाणे ही माहिती अपिलार्थीस पुरविली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पुरवावी लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा साखर सह संचालक (अर्थ) / (विकास), पुणे यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती व जो प्रादेशिक सह संचालक (साखर), अहमदनगर, कोल्हापूर, नांदेड, पुणे व औरंगाबाद कडील आहे ती यापूर्वी अपिलार्थीस देण्यात आली नसेल तर ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड अजित एम. देशमुख, व्दारा - गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा साखर सह संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

जन माहिती अधिकारी तथा साखर सह संचालक (विकास), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा साखर संचालक, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर,

पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

ॲङ अजित एम. देशमुख, : अपीलकर्ता

व्दारा - गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

साखर आयुक्त यांचे कार्यालय, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५

जन अपिलीय अधिकारी तथा :

साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे

१ अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२७

२ सुनावणीची तारीख दि. १८-०१-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

साखर सह संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५ - श्री. बी. जे. देशमुख

३.३ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

साखर सह संचालक (विकास), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५ - श्री. ए. यु. बनसोडे

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

साखर संचालक, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर,

पुणे - ०५ - प्रतिनिधी - श्री. बी. जे. देशमुख

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०४-२००८

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ११-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-०५-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५-०६-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०९-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (१) व (२) व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती विविध शाखेशी संबंधित असल्याने ही माहिती परस्पर उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविले आहे. दिनांक २१-०४-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ४५० रुपये शुल्क भरण्याचा तपशील देऊन शुल्क भरण्याचे अपिलार्थीस कळविल होते तदनतर सह संचालक (अर्थ) यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक १४-०८-२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थी यांना सह संचालक (अर्थ) यांनी दिनांक १४-०८-२००८ रोजी पाठविलेले पत्र आज रोजी आयोगासमोर आहे. त्यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी उपस्थित राहिले होते व त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या संचिकेतील काही माहिती त्यांनी घेतली आहे व इतर माहिती साखर आयुक्तांच्या अन्य विभागांकडून मिळाली आहे. अशा प्रकारे ४५ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे व त्याच दिवशी त्यांना माहिती मिळाली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रावरुन व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. त्यांनी रुपये ९० शुल्क भरुन व्यक्तिशः माहिती घेतली आहे. याच प्रकरणात विकास शाखेकडील माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००८ रोजी पाठविण्यात आली आहे. त्या माहितीचा एक संच जन माहिती अधिकारी विकास यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास दाखविला व ही माहिती ते अपिलार्थीस पुन्हा देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड अजित एम. देशमुख, व्दारा - गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा साखर सह संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

जन माहिती अधिकारी तथा साखर सह संचालक (विकास), साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा साखर संचालक, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर,

पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहनराव शंकर जाधव, | : | अपीलकर्ता |
| | मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | मुख्याध्यापक, नाथोबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | मुख्याध्यापक, नाथोबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०३-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०४-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००८ फेरसादर दि. १५- |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणावर आहे व त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९२ ते २००७ या कालावधीची माहिती मागितली आहे. या माहितीच्या झेरॉक्स प्रती पुरविण्याकरिता एकूण ३२९०४ रुपये इतक्या मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्च आहे. त्यासाठी मनुष्यबळही मोठ्या प्रमाणात लागणार आहे आणि तो आर्थिक खर्च करण्यासाठी संस्थेची आर्थिक बाजू कमकुवत आहे असे दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथोबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीस कळविले आहे. तसेच अपिलार्थीस कागदपत्राची पाहणी देण्यास ते तयार आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथोबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांच्या कार्यालयात जाऊन त्यांनी मागितलेल्या सुमारे १५ वर्षाच्या विस्तृत माहितीची पाहणी करावी असा आयोगाचा निष्कर्ष आहे. यास्तव आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथोबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयात एक दिवस निश्चित करुन पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहनराव शंकर जाधव, मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२.	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथोबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. सविता धोंडिराम राचमाळे, : अपीलकर्ता

अभिनवनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

१ अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२९

२ सुनावणीची तारीख दि. १८-०१-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

गट सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, म. ढाळेगाव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

- श्री. आर. पी. कांबळे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. के. आर. घुले

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०६-०५-२००८

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०७-२००८

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-१०-२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस प्रथम सुनावणीच्या वेळी दिनांक ०५-०८-२००८ रोजी देण्यात आली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या वेळी काही पूरक माहिती मागितली ती माहिती सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०८-२००८ व २७-०८-२००८ रोजी अपिलार्थीस दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली आहे असे कागदपत्रावरुन आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सविता धोंडिराम राचमाळे, अभिनवनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, म. ढाळेगाव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पी. एन. बहात्रे,<br>घर नं. १८०, सहयोगनगर वर्कशॉपजवळ, नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकित्सक,<br>व्दारा- श्री गुरुगोविंदसिंग शासकीय रुग्णालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकित्सक,<br>व्दारा- श्री गुरुगोविंदसिंग शासकीय रुग्णालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, डॉ. श. च. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकित्सक तथा वैद्यकीय अधीक्षक, नांदेड - प्रतिनिधी - श्री. सी. एन. देशमुख, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-१२-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०२-२००८<br>फेरसादर दि. ०४-१०-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संबंधित माहिती ही जिल्हा शल्य चिकित्सक तथा वैद्यकीय अधीक्षक, नांदेड यांच्याकडे उपलब्ध नसून ती सर्वोपचार डॉ. श. च. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांच्याकडे

उपलब्ध आहे. त्यानुसार सदर माहिती अधिकारातर्गतचा अर्ज माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, डॉ. श. च. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना दिनांक १९-११-२००७ रोजी दिलेला आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अधिष्ठाता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत सदरची माहिती अपिलार्थीस देय होत आहे व ती देण्यात आली आहे किंवा कसे याबाबतची माहिती आज त्यांच्याकडून सुनावणीत प्राप्त होऊ शकली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. याकरिता अपिलार्थीने मागितलेली माहिती यापूर्वी देण्यात आली नसेल तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, डॉ. श. च. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना ती अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस द्यावी लागेल व दिली असल्यास तसे आयोगास कळवावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, डॉ. श. च. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस देण्यात आली नसेल तर ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पी. एन. बहात्रे, घर नं. १८०, सहयोगनगर वर्कशॉपजवळ, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, डॉ. श. च. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक तथा वैद्यकीय अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आतार खाजा मैनोद्दीन हाजीमिया, : अपीलकर्ता
रा.हणेगाव,ता.देगलूर, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
कै. इंदिराबाई देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,
हणेगाव, ता.देगलूर,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.०९.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्याची तारीख | | दि. २४.११.२००८ (फेरसादर - दि.०३.०७.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे आयोगास प्रकरणातील सद्यस्थिती कळू शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झालेली नाही. शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, नांदेड तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे मुख्याध्यापक, कै. इंदिराबाई देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,हणेगाव, ता.देगलूर,जि.नांदेड यांना अपिलार्थीस पंधरा दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले होते. तरीही मुख्याध्यापक यांनी अद्यापि माहिती दिलेली नाही. त्यासंदर्भातील खुलासाही मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,हणेगाव, ता.देगलूर,जि.नांदेड यांनी दिलेला नाही. यास्तव जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,हणेगाव, ता.देगलूर,जि.नांदेड यांना अपिलार्थीस माहिती द्यावी लागेल व आतापर्यंत अपिलार्थीस माहिती का देण्यात आली नाही, याचा खुलासा आयोगास सादर करावा लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,हणेगाव, ता.देगलूर,जि.नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, हणेगाव, ता.देगलूर, जि.नांदेड यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाला आहे. याबाबतचा खुलासा त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.नांदेड यांचेमार्फत हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आतार खाजामैनोदीन हाजीमिया, मु.पो.हणेगाव,ता.देगलूर, जि.नांदेड-४३१ ७४१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, हणेगाव, ता.देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मो. मोईजखान पठाण, : अपीलकर्ता
नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,पुरवठा विभाग,नांदेड

जन अपिलीय अधिकारी, :
तहसील कार्यालय,पुरवठा विभाग,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०५.२००८ (फेरसादर - दि.२७.११.२००८) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे आयोगास प्रकरणातील सद्यस्थिती कळू शकली नाही.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,नांदेड यांनी या प्रकरणात सुनावणीची पुढील तारीख देण्यासाठी विनंतीवजा अर्ज आयोगाचे कार्यालयात दाखल केला असल्याचे दिसून येत आहे. प्रकरण दि.२९.०४.२००८ पासून प्रलंबित आहे तसेच आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविण्यात आली किंवा कसे हे, दिसून येत नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती अद्यापपर्यंत पाठविल्या नसतील तर, अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अद्यापपर्यंत त्यांना दिली नसल्यास, ती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मो. मोईज खान पठाण, द्वारा सचिन जनरल स्टोअर्स,प्र.नि.हा.शाळेजवळ, कैलासनगर, ता.जि.नांदेड - ४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सतिश प्रभाकरराव दिवाण, : अपीलकर्ता
रा.पाथरी, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,पाथरी, जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म-२), पाथरी, जि.परभणी- श्री. सोनवणे एन.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, पाथरी, जि.परभणी - डॉ. श्रीमंत चांगदेव हारकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.०८.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.१२.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-२), तहसील कार्यालय,पाथरी, जि. परभणी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि. ०८.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः देण्यात आली असून त्यावर अपिलार्थीने दि.११.०८.२००८ रोजी पोच दिल्याचे दिसून येत आहे.अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये, त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण, चुकीची, दिशाभूल करणारी व गोलमाल स्वरुपाची आहे, असे नमूद केले आहे. तथापि याबाबतचे नेमके मुद्दे त्यांनी या अपील अर्जात नमूद केलेले नाहीत. त्यामुळे या बाबी विचारात घेता येणे शक्य नाही.अपिलार्थी अनुपस्थित आहेत, त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे, असे उपलब्ध कागदपत्रांवरुन व आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन सिध्द होत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सतीश प्रभाकरराव दिवाण, 'शिवप्रसाद', शिक्षक कॉलनी, पाथरी, ता.पाथरी, जि. परभणी -४३१ ५०६.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-२),तहसील कार्यालय,पाथरी, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोविंद श्रीपतराव हिवाळे, : अपीलकर्ता
रा.परतुर, जि. जालना.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता, ल.पा. (स्था.स्तर),
उपविभाग घनसावंगी, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
ल.पा.(स्था.स्तर),जालना

१ अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३४

२ सुनावणीची तारीख दि. १८-०१-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर),उपविभाग घनसावंगी, जि.जालना- श्री. बी.जे. पांचाळ : उपस्थित

३.३ जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्तर),जालना-प्रतिनिधी - श्री. डी.एन.गलबे, कनिष्ठ अभियंता : उपस्थित

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख प्रत जोडलेली नाही.

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. -

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६.०४.२००८

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०६.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर),उपविभाग घनसावंगी, जि.जालना यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे दि. ०१.०४.२००५ ते १५.०३.२००८ या कालावधीतील घनसावंगी, जि. जालना मधील रोहयोअंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या पाझर तलाव व गाव तलावाच्या कामांची माहिती, हजेरीपत्रकांच्या सत्यप्रती, मजूरांना वाटप केलेला पगार, मस्टरच्या सत्यप्रती अशी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. यामध्ये अंदाजे ७५ कामांचा समावेश होईल. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, कामांची यादी, अंदाजपत्रकाची रक्कम, कुशल-अकुशल कामांचा तपशील इत्यादीसंदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयातील कार्यप्रणालीनुसार अभिलेख ठेवण्याच्या प्रचलित पध्दतीनुसार ठेवलेली आहे.अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना द्यावी लागेल. सदर माहिती विस्तृत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास सांगितले आहे.त्यामुळे सदर माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस निरीक्षणासाठी उपलब्ध करुन त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस द्याव्यात.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस पहाणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत. त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती विनामूल्य हस्तगत करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करावी. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोविंद श्रीपतराव हिवाळे, मु.पो. साठेनगर,परतूर,ता.परतूर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर),उपविभाग घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्तर),जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विलास विष्णूदास मोरे, | : | अपीलकर्ता |
| | रा.गुगळीधामणगाव, ता.सेलू, जि.परभणी | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, मानवत,<br>जि.परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, मानवत, जि.परभणी- डॉ. अरविंद नरसीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०६.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.०९.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.११.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मानवत,जि.परभणी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पैसे भरुन न्यावी, असे अपिलार्थीस दि.३०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. तथापि या पत्रामध्ये शुल्कापोटी एकूण किती रक्कम भरावयाची, ही बाब जन माहिती अधिकारी यांनी कळविलेली नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास हेही सांगितले की, त्यांच्याकडील दि. ०३.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ ते १० च्या संदर्भातील माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे कार्यालयात उपस्थित राहून पहाणी करावी व आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती आपणास देण्यात येतील, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०५.०८.२००८ च्या पत्रान्वये शासकीय माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, मानवत यांना कळविले आहे की, त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांना विनामूल्य द्याव्यात.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस पहाणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत. त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती विनामूल्य हस्तगत करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ सुनिश्चित करावी. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १८-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णूदास मोरे, मु.पो.गुगळी धामणगाव, ता.सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मानवत, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजय सितारामपंत खारकर, : अपीलकर्ता
रा.सेलू, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय उपआयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी - प्रतिनिधी - श्री. पी.एम.ननवरे,अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद - प्रतिनिधी - सौ. एस.आर.भाले, ना.त.नगरपालिका प्रशासन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची/ प्राप्त झाल्याची तारीख | | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०.०९.२००८ (विभागीय आयुक्त, औरंगाबाद मार्फत प्राप्त ) द्वितीय अपील संबोधून दाखल करुन घेतले. |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या अखत्यारीतील एकूण सहा नगरपालिकाची माहिती मागितली आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज दि. ३०.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये संबंधित नगर पालिका यांना पाठविला आहे. त्यानंतर संबंधित सर्व नगरपालिकांनी (पूर्णा न.प.वगळून) अपिलार्थीस माहिती पुरविली आहे, असे दिसून येत आहे.त्यामुळे पूर्णा नगर परिषदेसंदर्भातील माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

अपिलार्थी यांनी दि.१८.०१.२०११ रोजी आयोगाचे कार्यालयास फॅक्सद्वारे कळविले आहे की, त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण आहे व सोनपेठ नगर परिषदेने चुकीची व खोटी माहिती दिली आहे..अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, चुकीची व खोटी कशी आहे, या आक्षेपाबाबतचे स्पष्टीकरण आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक आठवडयाचे आत जन माहिती अधिकारी यांना द्यावे, अपिलार्थीकडून स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी तीन आठवडयाचे आत या बाबी जिल्हाधिकारी यांचे नजरेस आणून त्यांच्या अभिप्रायासह उर्वरित माहिती अपिलार्थीस त्वरित पुरवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील पूर्णा नगरपालिकेसंदर्भातील माहिती आणि अपिलार्थीकडून त्यांना यापूर्वी प्राप्त झालेल्या माहिती संदर्भातील वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या आक्षेपाबाबतचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अभिप्रायासह अपिलार्थीस विनामूल्य माहिती

पुरवावी. ही प्रक्रिया एक महिन्याचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजय सितारामपंत खारकर,१८,'पितृकृपा',आदर्शनगर,सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिलींद वसंतराव विटेकर, : अपीलकर्ता
रा.सोनपेठ, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी कार्यालय,जि.प.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०३.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे आयोगास प्रकरणातील सद्यस्थिती कळू शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही. याकरिता शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना आयोगाचे विशेष आदेश देण्यात येत आहेत की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे संदर्भित केलेल्या श्री मुक्तेश्वर विद्यालयासंदर्भात मागितलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस देय असलेली माहिती प्राप्त करुन घेऊन व उर्वरित त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहितीसह संपूर्ण माहिती संकलीत करुन अपिलार्थीस द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे संदर्भित केलेल्या श्री मुक्तेश्वर विद्यालयासंदर्भात मागितलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस देय असलेली माहिती प्राप्त करुन घेऊन व उर्वरित त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहितीसह संपूर्ण माहिती संकलीत करुन हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, विटेकर निवास,ब्राह्मण गल्ली, सोनपेठ, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालासाहेब रामराव शेंगुळे, : अपीलकर्ता
रा.रावराजुर, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सरव्यवस्थापक,
इंडो शुगर्स लि.उजना,ता.अहमदपूर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०१.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०१.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे आयोगास प्रकरणातील सद्यस्थिती कळू शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे, ती इंडो शुगर्स लि.उजना,ता.अहमदपूर,जि.लातूर ही एक खाजगी कंपनी आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ या कंपनीस लागू होत नाही. याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी या प्रकरणातील अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेऊन दि. १६.०१.२००८ रोजीच्या आदेशान्वये प्रथम अपील फेटाळले आहे.प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते,असे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संदर्भिय प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब रामराव शेंगुळे, मु.पो.रावराजुर, ता.पालम,जि.परभणी

२. सरव्यवस्थापक/कार्यकारी संचालक, इंडो शुगर्स लि.उजनी,ता.अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शरद बा.कुलकर्णी, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. शरद बा.कुलकर्णी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९.०६.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०९.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास असे अवगत केले की, बोकुडजळगाव ता.पैठण जि.औरंगाबाद येथील शासकीय रस्त्यावर अतिक्रमण झाल्याबाबत विभागीय आयुक्त यांच्याकडे तक्रार केली होती. त्यावर विभागीय आयुक्त यांनी श्री. ए.एम.देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना सदर प्रकरणात चौकशी करण्याचे आदेश दिले होते. यावर त्यांनी चौकशी करुन त्यांचा चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्याकडे सादर केलेला आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीमध्ये या अहवालाची प्रत त्यांना प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या दि. १६.०३.२००५ रोजीच्या चौकशीच्या अहवालामध्ये श्री. देशमुख यांनी जे निष्कर्ष काढले आहेत, ते निष्कर्ष त्यांनी कोणत्या कागदपत्रांच्या आधारे काढले आहेत, त्या कागदपत्रांच्या प्रतींची त्यांना आवश्यकता आहे. यास्तव संबंधित संचिकेतील या संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील. ही संचिका जिल्हा परिषद,औरंगाबाद कार्यालयात उपलब्ध असावयास हवी, असे आयोगाचे मत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संदर्भिय प्रकरणाशी संबंधित संचिका अपिलार्थीस पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः पुरवाव्यात. ही प्रक्रिया हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०१-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. शरद बा.कुलकर्णी, १६७, 'बलवंत', ज्योतीनगर,ज्योती मंदीराजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती नुझहत पि.महेबुबखान, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी.
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्रीमती नुझहत पि.महेबुबखान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०१.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२००८ (फेरसादर-दि.१३.०५.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास असे अवगत केले की, त्यांनी मागितलेल्या माहितीतील एकूण ४२ मुद्यांपैकी त्यांना एकूण २१ मुद्यांसंदर्भातील माहिती पूर्णपणे मिळाली आहे. उर्वरित माहितीपैकी ३ मुद्यांसंदर्भातील माहिती अपूर्ण व चुकीची मिळाली आहे व १७ मुद्यांसंदर्भातील माहिती त्यांना मिळालेली नाही. यासंदर्भात अपिलार्थीने अपूर्ण व चुकीची म्हणजे काय याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल करावा व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी योग्य माहिती तसेच उर्वरित १७ मुद्यांसंदर्भातील माहिती, जी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अद्याप दिलेली नाही ती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी. जन माहिती अधिकारी हे वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्याची व्यवस्था करतील, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी व्यक्तिशः पहावे.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने देय होणारी संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांनी व्यक्तिशः पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. नुझहत पि.महेबुब खान, रा.विद्यानगर,परभणी, ता.परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहन काळुराम यादव,<br>'यादव कॉम्पलेक्स', व्ही. आय. पी. रोड, नवा मोंढा,<br>नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी (तांत्रिक), तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड<br>- प्रतिनिधी - मंडळ कृषि अधिकारी, बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड - श्री. शिनगारे एम. ए. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०६-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०८-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-१२-२००७ फेरसादर दि. २८-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीकरिता अपिलार्थीस दिनांक ०४-०७-२००७ रोजी कळविण्यात आले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या सर्व कागदपत्राच्या एकूण ४८८० प्रतिकरिता प्रतिपृष्ठ दोन रुपये याप्रमाणे एकूण रुपये ९७६० रोख स्वरुपात कार्यालयात भरणा करण्यात यावे. तथापि अपिलार्थी यांनी या रक्कमेचा भरणा केलेला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कागदपत्राच्या पुर्ततेसाठी आवश्यक रकमेचा भरणा करण्याचे अपिलार्थीस कळविले असल्याचे आढळून येत आहे. यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहन काळुराम यादव, 'यादव कॉम्पलेक्स', व्ही. आय. पी. रोड, नवा मोंढा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी (तांत्रिक), तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी,<br>नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ. स.), नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ. स.), नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ. स.), नांदेड<br>- श्री. रामकिसन भूजंगराव कंदकूर्तीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ. स.), नांदेड<br>- श्री. भा. भ. सखैय्या | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-११-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०१-२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०४-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-०५-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२००७<br>फेरसादर दि. ०५-०८-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत प्रमाणात ३२ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये ही बाब मान्य केली. तसेच ३२ मुद्दयांची मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे असे आयोगासमोर कबूल केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित आहेत व त्यांना माहिती मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ. स.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ. स.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणेश हिरामण पिंपळे,<br>अण्णाभाऊ साठे चौक, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२९४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०८-२००६ (वर्ष २००७ असावे) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०८-२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-११-२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना

त्यांच्या कार्यालयातील माहितीच्या उपलब्धततेबाबत कळविले आहे. यास्तव प्रकरण निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश हिरामण पिंपळे, अण्णाभाऊ साठे चौक, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नरसिंग विश्वासराव नायक, : अपीलकर्ता
रा. हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती कार्यालय, सेनगाव,जि.हिंगोली

जन अपिलीय अधिकारी, :
पंचायत समिती कार्यालय,सेनगाव, जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली- श्री. मनोज व्यंकोबा लोखंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली - श्री. आर. बी. बुरुड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव,जि.हिंगोली यांनी आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एकंदर अकरा गावांची सन २००८-०९ या कालखंडामधील मजूरांच्या हजेरीमस्टर्सच्या सत्यप्रती, दि.१९.०९.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितल्या आहेत. या सर्व कागदपत्रांच्या एकत्रित ६४०४ प्रती होत असून त्याचे प्रतिपृष्ठ ` २/- प्रमाणे शुल्क ` १२,८०८/- इतके भरणा करण्याकरिता अपिलार्थीस दि.१६.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.सदर पत्र पोस्टाद्वारे पाठविले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपिलार्थीने आजपावेतो आवश्यक त्या शुल्काचा भरणा केलेला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास सांगितले. यास्तव अपिलार्थीस या माहितीची आवश्यकता नाही, असे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत अपिलार्थीने मागितलेल्या विस्तृत माहितीचा आढावा घेऊन माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील कळविलेला आहे. त्यामुळे ही माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध होऊ शकणार नाही.अपिलार्थीस अजूनही या माहितीची आवश्यकता असल्यास माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काची रक्कम भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करु शकतात. ही कार्यवाही त्यांना आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नरसिंग विश्वासराव नायक,रा. रिसाला बाजार,हिंगोली, ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, सेनगाव, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव, जि . हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपीलकर्ता
रा.हिंगोली.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय,हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष यल्हाजी बांगर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लिपीक (पा.पु.), नगरपरिषद कार्यालय,हिंगोली -श्री.आर. व्ही. बांगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली - डॉ. प्रदीप ठेंगल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद, हिंगोली यांनी आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती सन २००१ पासूनची असून एकूण १२ मुद्यांवर विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती एकत्रित करण्याकरिता काही कालावधी लागणार होता. त्यामुळे त्यांच्याकडील दि. ०३.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्याबाबत कळविलेले आहे. ही बाब अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी मान्य केली. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिलेली आहे, असे आयोगास सुनावणीच्यावेळी सांगितले आहे. अपिलार्थी यांना ही माहिती मिळाली असल्याचे त्यांनी मान्य केले. भविष्यामध्ये माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत माहितीसाठी प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्याची दक्षता जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर,मंगळवारा बाजार, हिंगोली, ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक (पा.पु.), नगरपरिषद कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्ता पंडितराव आडकिने, : अपीलकर्ता
रा.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक,
पंचायत समिती, वसमत,जि.हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पंचायत समिती,वसमत,जि.हिंगोली - प्रतिनिधी - श्री. एन.जी.वैष्णव, कार्यालयीन अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,वसमत,जि.हिंगोली - डॉ. सुधीर ठोंबरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,वसमत,जि.हिंगोली यांच्या प्रतिनिधीने आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्यासंदर्भात त्यांना दि. २९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित बांधकाम विभागाचे काम पहाणारे कर्मचारी निवडणूक कामासाठी नियुक्त झाल्यामुळे माहिती देण्यास त्यांना उशिर लागेल, असे कळविले आहे. त्यांनी पुढे आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तयार असल्याचे दि. १९.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले व संपूर्ण माहिती देण्यात आली. त्याची पोच अपिलार्थीने त्याच दिवशी पत्रावर दिलेली आहे, तथापि त्यावर अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली, असे नमूद केले आहे.अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी घेतली. त्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी मागितलेली मुद्दा क्र.१,२ व ३ च्या संदर्भातील उर्वरित माहितीच्या सत्यप्रती विनामूल्य देण्यात याव्यात, असे सूचित करण्यात आले व अपिलार्थीस त्याचवेळी माहितीच्या प्रती देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपिलार्थी आज सुनावणीच्यावेळी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आली, असे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्ता पंडितराव आडकिने, द्वारा पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थनगर,

नांदेडरोड,रा.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरवडे उत्तमराव कुंडलिकराव, : अपीलकर्ता
रा.मसोड, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, हिंगोली - प्रतिनिधी - श्री. व्ही. एस.आकुलवार, नायब तहसीलदार (पुरवठा) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,हिंगोली यांच्या प्रतिनिधीने आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि. ०९.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे. अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.१२.२००९ रोजी सुनावणी घेऊन अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांना पंधरा दिवसांच्या आत देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार हिंगोली यांनी दि. २९.१२.२००९ रोजी अर्जदारास पुन्हा एकदा त्यांनी मागितलेल्या माहितीचा तपशील दिला आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरवडे उत्तमराव कुंडलिकराव, रा.मसोड, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणपत ग्यानोजी गायकवाड, : अपीलकर्ता
रा.खंडाळा, ता.जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, हिंगोली - प्रतिनिधी - श्री. व्ही. एस.आकुलवार, नायब तहसीलदार (पुरवठा) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,हिंगोली यांच्या प्रतिनिधीने आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. सदरची माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांच्या कार्यालयात का उपलब्ध नाही, याची शहानिशा होणे आवश्यक आहे. तरी उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी या प्रकरणी चौकशी करावी व त्याबाबत योग्य ती प्रशासकीय कारवाई योजावी. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

यास्तव आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे, याबाबत उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी चौकशी करावी व त्यानंतर पुढील प्रशासकीय कारवाई योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणपत ग्यानोजी गायकवाड, मु.पो. खंडाळा, ता.जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पिराजी लक्ष्मण खिल्लारी, : अपीलकर्ता
रा.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी (ग्रामीण), हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी,हिंगोली (ग्रा.)- श्री. एम.एस.पेरके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,हिंगोली (ग्रा.) यांनी आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे एकूण १८ मुद्यांवर माहिती मागितली आहे. दि. ३१.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः सशुल्क माहिती पुरविण्यात आली आहे.सदर पत्रावर अपिलार्थीने दि.०१.०१.२०१० रोजी माहिती मिळाल्याची पोचसही केली असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलावर झालेल्या सुनावणीच्यावेळी दि. २०.०३.२०१० रोजी अर्जदारास पूर्ण माहिती दिली. अशारितीने अपिलार्थी यांना एकूण १०३ पृष्ठांची माहिती पुरविण्यात आली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन व आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आली असल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पिराजी लक्ष्मण खिल्लारी,रा. आनंदनगर, हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,हिंगोली (ग्रामीण)यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद मुजाहेद सय्यद अहेमद,<br>रा.शिरडशहापूर, ता.औंढा (नाग.),जि.हिंगोली. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, औंढा (नाग.), जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, वसमत,जि.हिंगोली. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद मुजाहेद सय्यद अहेमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,औंढा (नाग.), जि. हिंगोली - प्रतिनिधी - श्री. टी.आर.राठोड, नायब तहसीलदार (पु.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, वसमत, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा (नाग.),जि.हिंगोली यांच्या प्रतिनिधीने आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जवळाबाजार, ता.औंढा नागनाथ येथील श्री. लक्ष्मण बालाजी डफडे या अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यासंदर्भात जानेवारी,२००० ते जुलै,२००९ (९ वर्षे) या कालावधीची तपशीलवार माहिती मागितली आहे. त्या माहितीचे आकारमान विस्तृत स्वरुपाचे आहे. सदर माहिती प्रत्यक्षात त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी सदर माहिती देण्याकरिता संबंधित विक्रेत्याकडे पाठपुरावा केला तरीसुध्दा त्यांच्याकडे माहिती प्राप्त झाली नाही, असे आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे सांगितले. तथापि यासंदर्भात कागदोपत्री पुरावा आयोगास सुनावणीच्यावेळी ते सादर करु शकले नाहीत.याकरिता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती संबंधित अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागेल व संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्यास, त्याबाबतची चौकशी करुन पुढील प्रशासकीय कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना करावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१.१२.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांना अपिलार्थीस विनाशुल्क माहिती दि. ११.१२.२००९ पर्यंत द्यावी, असे आदेशित केलेले दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, त्यांनी दि. ०७.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे सुमारे ९ वर्षांची माहिती मागितली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मागितलेल्या या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करुन तीन वर्षांची म्हणजेच दि. ०१.०१.२००५ ते ३१.१२.२००७ या कालावधीची माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्यांची काही हरकत नाही, असे आयोगास सांगितले. ही बाब आयोगाने मान्य केली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असून त्यासंदर्भातील पुरावा आयोगासमोर सादर केला असल्यामुळे त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा (नाग.),जि.हिंगोली यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे दि.०१.०१.२००५ ते ३१.१२.२००७ या कालावधीतील माहितीच्या प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

२) वरील आदेशाप्रमाणे माहितीच्या प्रती संबंधिताकडून उपलब्ध झाल्या नाहीत तर या प्रकरणात योग्य ती प्रशासकीय कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद मुजाहेद सय्यद अहेमद, रा.शिरडशहापूर,ता.औंढा (नाग.), जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा (नाग.), जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा पुरवठा अधिकारी,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद मुजाहेद सय्यद अहेमद, : अपीलकर्ता
रा.शिरडशहापूर, ता.औंढा (नाग.),जि.हिंगोली.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, औंढा (नाग.), जि.हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, वसमत,जि.हिंगोली.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद मुजाहेद सय्यद अहेमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,औंढा (नाग.), जि. हिंगोली - प्रतिनिधी - श्री. टी.आर.राठोड, नायब तहसीलदार (पु.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, वसमत, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,  जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा (नाग.),जि.हिंगोली यांच्या प्रतिनिधीने आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जवळाबाजार, ता.औंढा नागनाथ येथील श्री. नारायण मुकिंदाअप्पा डफडे या अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यासंदर्भात जानेवारी,२००० ते जुलै,२००९ (९ वर्षे) या कालावधीची तपशीलवार माहिती मागितली आहे. त्या माहितीचे आकारमान विस्तृत स्वरुपाचे आहे. सदर माहिती प्रत्यक्षात त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी सदर माहिती देण्याकरिता संबंधित विक्रेत्याकडे पाठपुरावा केला तरीसुध्दा त्यांच्याकडे माहिती प्राप्त झाली नाही, असे आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे सांगितले. तथापि यासंदर्भात कागदोपत्री पुरावा आयोगास सुनावणीच्यावेळी ते सादर करु शकले नाहीत.याकरिता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती संबंधित अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागेल व संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्यास, त्याबाबतची चौकशी करुन पुढील प्रशासकीय कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना करावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१.१२.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांना अपिलार्थीस विनाशुल्क माहिती दि. ११.१२.२००९ पर्यंत द्यावी, असे आदेशित केलेले दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, त्यांनी दि. ०७.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे सुमारे ९ वर्षांची माहिती मागितली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मागितलेल्या या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करुन तीन वर्षांची म्हणजेच दि. ०१.०१.२००५ ते ३१.१२.२००७ या कालावधीची माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्यांची काही हरकत नाही, असे आयोगास सांगितले. ही बाब आयोगाने मान्य केली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असून त्यासंदर्भातील पुरावा आयोगासमोर सादर केला असल्यामुळे त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **<u>आदेश</u>**

३) जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा (नाग.),जि.हिंगोली यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे दि.०१.०१.२००५ ते ३१.१२.२००७ या कालावधीतील माहितीच्या प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

४) वरील आदेशाप्रमाणे माहितीच्या प्रती संबंधिताकडून उपलब्ध झाल्या नाहीत तर या प्रकरणात योग्य ती प्रशासकीय कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद मुजाहेद सय्यद अहेमद, रा.शिरडशहापूर,ता.औंढा (नाग.), जि.हिंगोली
२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा (नाग.), जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. जिल्हा पुरवठा अधिकारी,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दांडेगावकर प्रदीप दामोधरराव, : अपीलकर्ता

धरम काट्याजवळ, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०५-२००९ फेरसादर दि. १८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास जरुरीचे वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दांडेगावकर प्रदीप दामोधरराव, धरम काट्याजवळ, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | डॉ. सुभाष रमराव कदम,<br>मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्र. प्रशासन अधिकारी, सह संचालक उच्च शिक्षण कार्यालय, नांदेड<br>- श्री. पवार वसंत मारुतीराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती दिनांक २०-०४-२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः हस्तगत केलेली आहे त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीस माहिती मिळाली आहे त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढावे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. सुभाष रमराव कदम, मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा प्र. प्रशासन अधिकारी, सह संचालक उच्च शिक्षण कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष यल्हाजी बांगर,<br>मंगळवारा बाजार, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष यल्हाजी बांगर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली -<br>प्रतिनिधी - श्री. र. वै. मिटकरी, नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली -<br>प्रतिनिधी - श्री. बी. एस. घुगे, जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या ४ मुद्दयांपैकी २ मुद्दयांची माहिती (मुद्दा क्रमांक १ व ४) प्रथमतः देण्यात आली व त्यानंतर मुद्दा क्रमांक ३ ची माहिती दिनांक १८-१०-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. आज रोजी त्यांच्याकडे मुद्दा क्रमांक २ ची माहिती उपलब्ध आहे आणि ती अपिलार्थीस देत आहेत. त्याप्रमाणे ही माहिती अपिलार्थीस देण्यात यावी.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती प्राप्त झाली आहे ही बाब मान्य केली. परंतु माहिती उशिराने मिळाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी अशी विनंती आयोगास केली.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००९ रोजी सुनावणी घेतली आहे व त्यामध्ये माहिती देण्यास विलंब झाला असला तरी त्यामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांची असद्‌भावना दिसून आली नाही असे नमूद केले आहे. तथापि माहिती देण्यास विलंब झाला असल्याने भविष्यात विलंब होऊ नये म्हणून सक्त ताकीद देण्यात येत आहे असेही नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सक्त ताकीद जिल्हाधिका-यांनी जन माहिती अधिकारी यांना द्यावी असे आयोग सूचित करत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख युसूफ उर्फ मामू, : अपीलकर्ता
रेल्वे स्टेशन रोड, हिंगोली, तालुक जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मौजे बोरी शिकारी येथील सर्वे नं. गट नंबर ६९ मधील १ हेक्टर ६४ आर जमिनीचा फेरफार क्रमांक ४४३ ची नक्कल, अर्ज, बॉण्ड, संमतीपत्राची नक्कल, गट क्रमांक ६९ मधील फेरफारसाठी दाखल केलेल्या संचिकेची नक्कल

अशी माहिती मागितली आहे. ही कागदपत्रे तात्काळ सादर करण्या-करिता दिनांक ३०-०३-२००९ रोजी तलाठी, तलाठी सजा, बोरी शिकारी यांना तहसीलदार, हिंगोली यांनी कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेताना जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, हिंगोली यांनी सदरची माहिती आठ दिवसाच्या आत अपिलार्थीस देण्यात यावी असे तहसीलदार, हिंगोली यांना आदेश दिलेले आहेत.

आज रोजी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही उपस्थित नाहीत त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत झाली नाही. तथापि अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिलेली नसल्यास ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल व याची परीपुर्तता होईल ही बाब तहसीलदार, हिंगोली यांना पहावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती अद्यापही अपिलार्थीस दिली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पाठवावी व या बाबीची परीपुर्तता होईल याची दक्षता तहसीलदार, हिंगोली यांनी स्वतः घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख युसूफ उर्फ मामू, रेल्वे स्टेशन रोड, हिंगोली, तालुक जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्ता पंडितराव अडकिने,<br>व्दारा- पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थनगर, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक जिल्हाधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात १५ पृष्ठांकरिता प्रतिपृष्ठ रुपये दोन या प्रमाणे शुल्क कार्यालयात जमा करण्याकरिता दिनांक १७-०७-२००९ रोजी कळविले आहे. त्यानंतर अपिलार्थीने शुल्काचा भरणा कार्यालयात केला व दिनांक १८-०८-२००९ रोजी अपिलार्थीने मागितलेली सर्व मुद्दयांवरची माहिती अपिलार्थीस टपालाने पाठविली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहीती मिळाली आहे असे आढळून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्ता पंडितराव अडकिने, व्दारा- पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थनगर, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश पुरभाजी यादव, : अपीलकर्ता
रा. बोरजा पो. येहळेगाव (सो.), तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (नागनाथ),
तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रमेश पुरभाजी यादव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (नागनाथ),<br>तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी<br>- श्री. राठोड टी. आर. नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (नागनाथ) | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-०९-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती ती आता तहसील कार्यालयात उपलब्ध करुन ठेवण्यात आलेली आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली आहे व ते पाहणी करु शकतात. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन पाहणी करण्याचे आयोगासमोर मान्य केले. त्याप्रमाणे दिनांक ०२-०२-२०११ रोजी सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० या कालावधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण माहितीवरील कागदपत्रे अपिलार्थीस पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. यास्तव आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (नागनाथ), तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली यांनी स्वतः अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती पाहणी करण्यासाठी दिनांक ०२-०२-२०११ रोजी सकाळी ११-०० ते सांयकाळी ०५-०० या कालावधीमध्ये उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य अपिलार्थीस देण्यात याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश पुरभाजी यादव, रा. बोरजा पो. येहळेगाव (सो.), तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (नागनाथ), तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणपत रामकृष्ण लोंढे, : अपीलकर्ता
रिसाला बाजार, हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली -<br>प्रतिनिधी - श्री. र. वै. मिटकरी, नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली -<br>प्रतिनिधी - श्री. बी. एस. घुगे, जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०६-२००९ फेरसादर दि. १०-०२-२०१० |

| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली<br>- प्रतिनिधी - श्री. एन. एम. शिंदे, अ. का. (म.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक जिल्हाधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - श्री. फुपाटे अे. डी. नायब तहसीलदार, वसमत | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याकारणाने त्यांना ते देऊ शकत नाहीत व माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध होईल त्या कार्यालयाचा पत्ता दिनांक १३-०४-२०१० रोजीच्या पत्राने कळविला आहे. या पत्राबरोबरच साई सेवा गॅस एजन्सी, वसमत यांचे दिनांक ०३-०४-२०१० रोजीच्या पत्राची प्रत संदर्भासाठी पाठविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे तसेच त्यांचा या प्रकरणाशी संबंध येत नसल्यामुळे व गॅस सिलेंडर आवक व जावकबद्दल तहसील कार्यालयाचा काही संबंध येत नसल्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थी संबंधित कार्यालया-कडे नवीन अर्जाने माहिती मागवू शकतात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाष रामराव कदम, : अपीलकर्ता
रा. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ,
परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ,
परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी<br>- प्रतिनिधी - ॲडः एस. एस. राठी, औरंगाबाद व डॉ. विलास यशवंतराव सोनवणे, प्राचार्य | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी<br>- प्रतिनिधी - ॲड एस. एस. राठी, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड एस. एस. राठी, औरंगाबाद व डॉ. विलास यशवंतराव सोनवणे उपस्थित आहेत.

संबंधित शिक्षण संस्थेने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती केलेली नाही कारण त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही असा युक्तिवाद आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर करण्यात आला. अशा शिक्षण संस्थेच्या बाबत अनुदानीत अथवा विना अनुदानीत शिक्षण संस्थाबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी हेच प्रथम अपिलीय अधिकारी होतात याची नोंद आयोगाने घेतली आहे.

सुनावणीच्या वेळी संस्थेतर्फे ॲड एस. एस. राठी यांनी आयोगासमोर त्यांचा युक्तिवाद मांडताना सांगितले की, या संस्थेला माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही व यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्रमांक ५२९४/०८ मध्ये दिनांक २८-०४-२००९ रोजी निर्णयही दिलेला आहे. त्यामध्ये खालील अभिप्राय दिले आहेत.

" .............. It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority.

.............. If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any information Officer and to entertain any such application under the Right to Information Act. "

तसेच ही बाब संस्थेच्या वकिलाने सुध्दा आयोगाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यामुळे आयोगाचे असे मत आहे की, अपिलार्थीने मागितलेली संस्थेची माहिती संस्थेतर्फे देय होणार नाही. तथापि संस्थेतर्फे सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाशी वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार तसेच कायद्याने नमूद केलेल्या कार्यप्रणालीमुळे जी कागदपत्रे निर्माण होतात ती सार्वजनिक कागदपत्रे होतात व ती जनतेसमोर (Public Domain) येतात. यास्तव अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे वेगळा अर्ज करता येऊ शकेल. या सर्व बाबी विचारात घेता सदरचे व्दितीय अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष रामराव कदम, रा. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. सचिव, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अध्यक्ष, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मुन्ना चंद्रमा सिंह,<br>पोस्ट ऑफिस रोड, बद्रीनारायण मंदिरामागे, नवा मोंढा, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली<br>- श्री. एस. जी. भुसेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक जिल्हाधिकारी, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती १९५२ सालातील व ऊर्दूमध्ये असल्याकारणाने ती जीर्ण अभिलेखामधून शोधणे कठीण जात आहे व प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे अपिलार्थीस कळविण्यात आले होते. अपिलार्थीने केलेल्या

प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०३-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, तहसीलदार, हिंगोली यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात यावी. तहसीलदार, हिंगोली यांनी माहिती मिळविण्याकरिता कसोशीने प्रयत्न केला आहे असे आढळून आले आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या कागदपत्राच्या नकला देण्यात आल्या असून अपिलार्थीने त्याची पोच दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती त्यांना पुन्हा अपिलार्थीस पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस पुन्हा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुन्ना चंद्रमा सिंह, पोस्ट ऑफिस रोड, बद्रीनारायण मंदिरामागे, नवा मोंढा, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रविंद्र बळीराम मोरे,<br>रा. सालेगाव, पो. सांडस, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा समन्वय अधिकारी,<br>महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समन्वय अधिकारी,<br>महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २०-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा समन्वय अधिकारी,<br>महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली<br>- श्रीमती निता मारोतराव अंभोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समन्वय अधिकारी,<br>महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली<br>- श्रीमती सुनिता गोरखनाथ चाहांदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १०-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २६-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस दुस-या एका संदर्भान्वये पुरविण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती पाहिजे असे त्यांच्या मूळ अर्जात नमूद केल्यामुळे माहिती उपलब्ध करुन ठेवण्यात आली तथापि अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत त्यामुळे त्या अपिलार्थीस माहिती देऊ शकल्या नाहीत. आता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. सालेगाव, पो. सांडस, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संदेश बालासाहेब देशमुख,<br>रा. सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,<br>तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,<br>तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,<br>तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,<br>तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमानुसार त्यांना देय होत आहे. ही माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्यास मुद्दा क्रमांक १, २ व ३ च्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः पुरवाव्या लागतील व मुद्दा क्रमांक ४ व्दारे एम. बी. रेकॉर्ड मागितले आहे त्याची पाहणी करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस सुनिश्चित करुन त्याची पाहणी अपिलार्थीस देण्यात यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, २ व ३ च्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अद्याप अपिलार्थीस दिल्या नसल्यास त्या अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवाव्यात. तसेच अपिलार्थीस एक तारीख निश्चित करुन मुद्दा क्रमांक ४ ची माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदेश बालासाहेब देशमुख, रा. सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वंबर गोविंदराव गरुड,<br>रा. लक्ष्मीनगर, भूषण प्रोव्हिजन जवळ, अकोला बायपास, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| २ | श्री. सतीश दत्तराव खाडे,<br>रा. लक्ष्मीनगर, भूषण प्रोव्हिजन जवळ, अकोला बायपास, हिंगोली | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली<br>- प्रतिनिधी - श्री. एन. एम. शिंदे, अव्वल कारकून (म.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक जिल्हाधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - श्री. डी. डी. फुपाटे,<br>नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, संबंधित मंडळ अधिका-याकडून अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती मिळण्या-करिता विलंब झाला आहे. तथापि आज रोजी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे व ते ही माहिती अपिलार्थीस देत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल व संबंधित मंडळ अधिकारी यांना जन माहिती अधिकाऱ्यास माहिती पुरविण्यास विलंब केल्याबद्दल तहसीलदार, वसमत यांनी संबंधित मंडळ अधिकाऱ्यास समज द्यावी व भविष्यात दक्ष राहण्याबाबत सूचित करण्यात यावं

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वंबर गोविंदराव गरुड, रा. लक्ष्मीनगर, भूषण प्रोव्हिजन जवळ, अकोला बायपास, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महमद आवेस म. गफूर अन्सारी,<br>हाजी दिवाणी मोहल्ला, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली<br>- श्री. शिवाजी पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली<br>- श्री. एन. ए. खान | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली<br>- श्री. रमेश माझीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, सध्याचे व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता रुपये दोन प्रतिपृष्ठ असे १८ पृष्ठांकरिता एकूण रुपये ३६ त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरणा करावे असे दिनांक ०३-०४-२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले होते. तथापि त्यांनी अद्यापपावेतो या शुल्काचा भरणा केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी पुन्हा एकदा अपिलार्थीस शुल्काचा भरणा करण्याकरिता कळवावे व शुल्काचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली आहे त्यामुळे नोंदणीकृत टपालाने पत्र पाठवून जन माहिती अधिका-याच्या कार्यालयात एक दिवस सुनिश्चित करुन त्यांना उपस्थित राहण्याकरिता कळवावे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाच्या स्तरावर अपील बंद करावे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महमद आवेस म. गफूर अन्सारी, हाजी दिवाणी मोहल्ला, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रावसाहेब विठ्ठलराव सोनवणे,<br>घर क्रमांक २४८, गंगानगर, खटकाळी, बायपास, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,<br>जिल्हा परिषद, हिंगोली - डॉ. एन. एल. भालेराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली<br>- श्री. रमेश माज्रीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात दिनांक ०४-०१-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे. त्याच-प्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या कागदपत्राची पाहणी त्यांच्या कार्यालयात देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी माहिती मागितलेल्या एकूण ११ मुद्दयांपैकी बरेचसे मुद्दे हे प्रश्नार्थक तसेच खुलासा अथवा स्पष्टीकरण मागणारे आहेत. ही बाब अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत येत नसल्यामुळे याबाबतची माहिती अपिलार्थीस देय नाही. तथापि त्याचप्रमाणे सदरचे प्रकरण हे न्यायप्रविष्ट आहे असे कागदपत्रावरुन आढळून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व त्यांना पुरविण्यात आलेली माहिती आणि चौकशी प्रकरण वगळून काही मुद्दयावरील माहितीच्या झेरॉक्स प्रती या जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस द्याव्यात. जसे मुद्दा क्रमांक ७, मुद्दा क्रमांक ११. या सर्व बाबी विचारात घेता हे प्रकरण या स्तरावर बंद करण्यात यावे असे आयोगाचे मत झ ाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रावसाहेब विठ्ठलराव सोनवणे, घर क्रमांक २४८, गंगानगर, खटकाळी, बायपास, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बालाजी रावसाहेब सोनवणे,<br>घर क्रमांक २४८, गंगानगर, खटकाळी, बायपास, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण संघ, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,<br>जिल्हा परिषद, हिंगोली - डॉ. एन. एल. भालेराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली<br>- श्री. रमेश माञ्रीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, सध्याचे व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे व माहितीचा कालावधी सन २००७ ते फेब्रुवारी २०१० पर्यंतचा आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची सर्व कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणी करण्याकरिता अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी रावसाहेब सोनवणे, घर क्रमांक २४८, गंगानगर, खटकाळी, बायपास, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तम दगडूजी बगाटे, : अपीलकर्ता
रा.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली.

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली. | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद, हिंगोली - श्री. ग.रे.राठोड | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली - श्री. रमेश माज्रीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग,जिल्हा परिषद, हिंगोली यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. २०.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही माहिती दि. २६.०३.२०१० रोजी स्वीकारली आहे. कागदपत्रांवरुन ही बाब आढळून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. यास्तव सदर द्वितीय अपील खारीज करण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडू बगाटे, सिध्दार्थनगर, दुधडेअरीजवळ,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद,

हिंगोली  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नागोराव तुकाराम तरटे,<br>रा.वडगाव, ता.कळमनुरी, ता.जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत मौ.वडगाव त.जवळा पांचाळ,<br>ता.कळमनुरी,जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>कळमनुरी,जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागोराव तुकाराम तरटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे वडगाव (त.ज.), ता.कळमनुरी,जि.हिंगोली - श्री. बिचकुले अनिल पांडुरंग | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कळमनुरी,जि. हिंगोली - श्री. बी.डी. पट्टेवाले | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली - श्री. रमेश माज्रीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.०२.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११.०६.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडगाव त. जवळा, ता.कळमनुरी, जि. हिंगोली यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. २१.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये असे अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे, त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे दि. १७.०२.२००९ रोजी घेतलेल्या ठरावाची प्रत व दुसऱ्या मुद्याद्वारे संदर्भित जागेसंबंधी नमुना नं.८ ची नक्कल अपेक्षिली आहे. आज रोजी आयोगाचे असे नजरेस आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी प्रश्नाधीन ठरावाची सत्यप्रत अपिलार्थीस दिली आहे. तथापि नमुना नं. ८ ची नक्कल दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांना सदर नमुना नं.८ ची अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली नक्कल प्रत नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस पाठवावी लागेल. सदर प्रत प्राप्त झाल्यावर त्यासंदर्भात काही तक्रार असल्यास अपिलार्थी संबंधित प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे स्वतंत्रपणे दाद मागू शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील नमुना नं. ८ ची नक्कल त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागोराव तुकाराम तरटे, मौ. वडगाव त. जवळा पांचाळ, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,वडगाव त. जवळा पांचाळ, ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे,<br>रा. वसमत, जि.हिंगोली. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती, वसमत,जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पंचायत समिती,वसमत, जि.हिंगोली- प्रतिनिधी - श्री. एन.जी.वैष्णव, कार्यालयीन अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कळमनुरी,जि. हिंगोली- डॉ. सुधीर ठोंबरे | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली - श्री. रमेश माज्रीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६.०६.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णय झाल्यानंतर उपलब्ध करुन ठेवण्यात आली व त्यानुसार अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून माहिती हस्तगत करण्यासाठी दि. २९.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपिलार्थी दि. १२.०४.२०१० रोजी पंचायत समिती कार्यालयात उपस्थित राहिले व त्यांनी माहिती हस्तगत केली आहे. याबाबतची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केली. तथापि अपिलार्थी यांनी मोघमत टिपणी केलेली आहे की, त्यांना मिळालेली माहिती दिशाभूल करणारी, अपुरी आहे. याबाबत नेमका उल्लेख केलेला दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस एकूण १२३ पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यामुळे ही बाब स्पष्ट होऊ शकली नाही तसेच त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती मिळालेली आहे,असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे,रमाई, ए-९५७, अशोकनगर, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे,<br>रा. वसमत, जि. हिंगोली. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,वसमत,जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती, वसमत,जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पंचायत समिती,वसमत, जि.हिंगोली- प्रतिनिधी - श्री. एन.जी.वैष्णव, कार्यालयीन अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कळमनुरी,जि. हिंगोली- डॉ. सुधीर ठोंबरे | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली - श्री. रमेश माज्रीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६.०६.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाच्या कर्मचाऱ्याशी संबंधित होती. तथापि त्यांच्याकडील दि. १२.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पाठविण्यात आली आहे. या पत्राच्या प्रतीवर अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाल्याबाबतची अपिलार्थी यांनी पोच दिली आहे.तथापि माहिती दिशाभूल करणारी व अपूरी आहे, असे मोघम नमूद केले आहे. याबाबत अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती दिशाभूल करणारी किंवा अपूरी दिली आहे, याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. तो करणे आवश्यक आहे. ही बाब त्यांनी कळविली असती तर जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न करता आले असते, असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सांगितले. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे,रमाई, ए-९५७, अशोकनगर, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.